# पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,

साधु वासवानी पथ, पोष्ट ऑफिसच्या जवळ,
कॅम्प पुणे - ४११ ००१ दुरध्वनी क्रं:- ०२० - २६२०८२५१





जा.क्र.पोआ/वाचक/अहवाल/ ४४ /२०२६ पुणे, दि.०१/०६/२०२६

प्रति,

मा. श्रीमती सुप्रिया सुळे,
संसद सदस्य, नवी दिल्ली,
भारत सरकार.

अलिकडच्या काळात पुणे शहर पोलीसांविरुध्द उपस्थित करण्यात येत असलेल्या मुद्यांवर आपल्या अवलोकनार्थ काही तथ्ये यासोबत सादर करण्यात येत आहे.

**अ. पुणे शहरातील गुन्हेगारी बाबतची वस्तुस्थिती**

१. पुणे शहरातील गुन्हेगारीचा कल कमी होताना दिसत आहे. सन २०२३ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये आणि सन २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये जवळजवळ सर्व प्रकारच्या गुन्हयांमध्ये घट झालेली आहे. पुणे शहरातील गुन्हेगारीचे प्रमाण कमी होताना दिसत आहे. हे आकेडीवारीवरुन स्पष्ट होते. सन २०२६ मध्ये जवळपास सर्व प्रकारच्या गुन्हयांमध्ये घट दिसुन आली आहे. गेल्या वर्षाच्या तुलने "हत्येचा प्रयत्न" च्या घटनांमध्ये अंदाजे २७ टक्यांनी घट झाली आहे. दुखापतीच्या ( Body Offences ) गुन्हयात ०३ टक्यांनी घट झाली आहे. साखळी चोरी आणि जबरी चोरीच्या घटनांमध्ये अनुक्रमे ५६ टक्क्यांनी आणि ३६ टक्यांनी अशी अभुतपूर्व घट झाली आहे. घरफोडी आणि चोरीच्या घटनांमध्ये अनुक्रमे १४ टक्के आणि २४ टक्के घट दिसुन येत आहे. खुनाच्या गुन्हयांमध्ये किरकोळ (६ गुन्हयांनी) वाढ झाली आहे, परंतु त्यापैकी किमान १० गुन्हे कुटुंबातील सदस्यांमध्ये झालेल्या वादातुन घडलेले आहेत. (उदा. मुलीने वडीलांची हत्या करणे, पतीने पत्नीची हत्या करणे इ.)

**तक्ता १. गुन्हयातील घट**

| गुन्हे | टक्केवारीतील बदल (संदर्भ कालावधी ०१.०१.२०२५ ते ३१.०५.२०२५ व ०१.०१.२०२६ ते २७.०५.२०२६) |
|---|---|
| खुन आणि खुनाचा प्रयत्न | -१०.५ % |
| जबरी चोरी | -३६% |
| साखळी चोरी | -५६% |
| घरफोडी | -१४% |
| चोरी | -२४% |
| वाहन चोरी | -२८% |
| दुखापत | -३% |
| बलात्कार | -७% |
| विनयभंग | -१% |

**१.** वाहनांच्या तोडफोडीच्या घटनांमध्येही लक्षणीय घट झाली आहे. सन २०२५ मधील याचा कालावधीच्या तुलनेत सन २०२६ मध्ये अश घटनामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली आहे, हे अल्पवयीन मुलांसाठी राबवलेले प्रबोधन उपक्रम, जीपीएस यंत्रणा आधारीत रात्रीची गस्त आणि पोलीसांची मजबूत दृष्यमानता यांचा परिणाम आहे.

**२.** सन २०२६ चे सुरुवातीचे ४ महिने गुन्हेगारीच्या दृष्टीकोनातून अत्यंत शांत होते, तथापि हे खरे आहे, की, मे २०२६ मध्ये १० दिवसांच्या अल्पावधीत ५ गंभीर घटना घडल्या, ज्यामुळे गुन्हेगारीमध्ये एकूणच वाढ झाल्याचे चित्र दिसत आहे.

**३.** गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी युध्दपातळीवर तात्काळ सुधारात्मक पावले उचलण्यात आली, आणि सर्व स्तरांवर विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत.गेल्या १० रात्रींपासुन मी स्वत: रात्रीची गस्त आणि कोम्बिग ऑपरेशनच्या देखरेखीसह सर्व शक्य ते आवश्यक प्रयत्न केले आहेत. ज्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यात आम्हांस यश आले आहे.

**४.** एका गोळीबार प्रकरणात पोलीसांची तत्परता आणि वेळेवर दिलेला प्रतिसाद उल्लेखनीय आहे.या घटनेत ज्यामध्ये पिडीत गंभीर जखमी झाला होता. आमची पथके तात्काळ घटनास्थळी पोहचली आणि जखमी इसमास शक्य ती सर्वोत्तम वैद्यकीय मदत मिळवून दिली. ज्यामुळे त्याचे प्राण वाचले आहे. ज्या प्रकरणात पिडीताच्या कुटूंबासह आणि प्रसार माध्यमांसह सर्वांनी त्याला मृत मानले होते.तेथे पोलीसांच्या गोल्डन आवर (Golden Hour) प्रतिसादाने आणि बारकाईने केलेल्या पर्यवेक्षणामुळे जखमी/पिडीताचे प्राण वाचले आहे.

५. वर नमूद केलेल्या ५ गंभीर घटनांपैकी आणखी एक प्रकरण  रिक्षा चालकावरील हल्ल्याचे होते. ज्यामध्ये आरोपींनी त्याला पुलावरुन खाली ढकलले होते. पोलीसांच्या तत्पर प्रतिसादामुळे पिडीताचे प्राण वाचले. पोलीसांचे अशाच जलद कारवाईमुळे इतर प्रकरणांमध्ये कोथरुड, वारजे आणि बंडगार्डन येथे आणखी ३ पिडीतांचे प्राण वाचले आहेत.

दुर्देवाने प्रथम प्रतिसादकर्त्याचा (First Respondent) या तत्पर प्रतिसादाची पुरेशी दखल समाज माध्यमांनी घेतली नाही. मी आपणास  खात्री  देतो की, पुणे शहर पोलीस दल अत्यंत प्रामाणिकपणे गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि गुन्हयांची उकल  करण्यासाठी कोणतीही कसर सोडत नाही.

**ब) पुण्यातील गुन्हेगारी देशात ५ व्या क्रमांकावर असल्याबाबतची वस्तुस्थितीहीन मांडणी :**

नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो (NCRB) ने प्रसिध्द केलेल्या नविनतम क्राईम इन इंडियानुसार (स्त्रोत- क्राईम इन इंडिया- NCRB)

१. दखलपात्र गुन्हयांचे प्रमाणात (एकूण IPC, BNS आणि SLL  गुन्हे) १९ महानगरापैकी पुणे १८ व्या क्रमांकावर आहे. (तक्ता - 1B.3 महानगरांमधील एकूण IPC, BNS आणि SLL  गुन्हे पृष्ठ १२३).

२. दखलपात्र गुन्हयांचे प्रमाणात (एकूण IPC, BNS गुन्हे ) १९ महानगरापैकी पुणे १५ व्या क्रमांकावर आहे. ( तक्ता - 1B.1महानगरांमधील एकूण IPC, BNS गुन्हे पृष्ठ १२१).

याचा अर्थ असा की, दखलपात्र गुन्हयांच्या प्रमाणात (एकूण IPC, BNS आणि SLL  गुन्हे) १९ महानगरांपैकी केवळ १ शहर पुण्याच्या तुलनेत चांगली कामगिरी करत आहे. आणि दखलपात्र गुन्हयांचे प्रमाणात ( एकूण IPC, BNS गुन्हे) ४ शहरे पुण्याच्या तुलनेत चांगली कामगिरी करत आहेत.

खुनाच्या दरामध्ये १९ महानगरांपैकी  पुणे ११ व्या क्रमांकावर आहे. (तक्ता - 2B.1 महानगरांमधील खुनाची प्रकरणे पृष्ठ क्र. २४३ ).

त्यामुळे पुण्याची गुन्हेगारी देशात पाचव्या क्रमांकावर आहे किंवा ती "गुन्हेगारीची राजधानी" आहे, असे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. उलटपक्षी एन.सी.आर.बी. (NCRB) ने जाहीर केलेल्या आकडेवारी नुसार पुणे हे एक सुरक्षित शहर म्हणून ओळखले जाते.

**क) संघटीत गुन्हेगारी नेटवर्क उध्वस्त करणे :-**

आजमितीस जवळपास सर्व प्रमुख संघटीत गुन्हेगारी टोळयांवर मोक्का (MCOCA) अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे. आणि अशा टोळयांचे बहुतांश सदस्य जवळपास एका वर्षापासून तुरुंगात आहेत.

तथापि, मे २०२६ मध्ये टोळीशी संबंधित खुनाचा प्रयत्न झाला होता, जिथे पोलीसांच्या त्वरीत प्रतिसादामुळे पिडीताचे प्राण वाचले, घटनेच्या १० तासांच्या आत सर्व ६ आरोपींना अटक करण्यात आली आणि त्यांचेवर मोक्का अंर्तगत कारवाई करण्यात आली आहे. या एकाच घटनेचा अपवाद वगळता गेल्या ६ महिन्यात टोळींशी संबंधित एकही घटना घडलेली नाही.

मोठया वितरण नेटवर्क असलेल्या बेकायदेशिर शस्त्रनिर्मिती कारखान्याचा पर्दाफाश करण्यासाठी पुणे शहर पोलीसांनी मध्य प्रदेशातील उमरटी येथे एक मोहिम राबविली. गुप्तचर माहितीची कसून पडताळणी , सखोल तपास आणि पुणे शहर पोलीसांच्या शिघ्र कृती दल (QRT) आणि रणनितीक युनिटच्या पाठिंब्यानंतर हे घडवून आणले गेले. स्थानिक पोलीसिंगवर या कारवाईचा मोठा परिणाम झाला आहे.

एन.डी.पी.एस. (NDPS) कायद्याअंतर्गत मागच्या २ वर्षात एकूण ५०० गुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत आणि २० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहे. तसेच राजस्थान ,गुजरात आणि दिल्लीसह देशाचे विविध भागात याच्याशी संबंधित दुवे शोधून काढले आणि उध्वस्त केले आहेत. २०२४ मध्ये एका आंतरराष्ट्रीय रॅकेटचा पर्दाफाश करुन ३७०० कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करुन नष्ट करण्यात आले होते, जी कोणत्याही राज्य यंत्रणेने केलेले आता पर्यंतचे सर्वात मोठी अंमली पदार्थ जप्तीची कारवाई आहे.

गेल्या २ वर्षात एम.पी.डी.ए. (MPDA) अंतर्गत २५० हून अधिक स्थानबध्दतेच्या कारवाया करण्यात आल्या आहेत, जे अभूतपूर्व असून राज्यात सर्वाधिक असावे. गेल्या २ वर्षात २०० मोक्का गुन्हयांमध्ये १००० हून अधिक गुन्हेगारांवर

कारवाई करण्यात आली आहे. तसेच गेल्या २ वर्षात ५०० हून अधिक गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले असून १५० हून अधिक शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत.

**तक्ता - २ : विशेष कायदयाअंतर्गत कारवाई**

| विशेष कायदे | पोलीसांनीकेलेली कारवाई |
|---|---|
| महाराष्ट्र दारुबंदी कायदा | २०२५ मधील याच कालावधीतील ५१४ कारवायांच्या तुलनेत २०२६ मध्ये १०२५ कारवाया (९९ टक्के वाढ) |
| अंमली पदार्थ आणि सायकोट्रॅपिक पदार्थ (NDPS) कायदा | २०२५ मधील याच कालावधीतील ५८ कारवायांच्या तुलनेत २०२६ मध्ये १२१ कारवाया (१०९ टक्के वाढ).<br>जप्तीचे एकूण मुल्य ४ कोटी रुपयांहून अधिक. |

**ड) कोयता "गँग" संदर्भात**

१. "कोयता गँग" हा शब्द संभाषणात अशा प्रकारे वापरला जातो की, ज्यामुळे पुणे शहराच्या रस्त्यांवर गुन्हेगारांची एक ठराविक टोळी मुक्तपणे फिरत आहे. आणि लोकांवर कोयत्याने हल्ला करत आहे, असा गैरसमज निर्माण करण्यात आला आहे.

२. 'कोयता गँग' हा शब्द प्रचलित असला तरी निदर्शनास आणून दिले जाते की, पुण्यात अशा कोणत्याही गुन्हेगारी कोयता टोळया नाहीत. तथापि, शारिरीक गुन्हयांमध्ये विविध प्रकारच्या धारदार शस्त्रांचा वापर केला जातो, अशा घटना घडतात, ज्याला सोशल मिडीयावर कोयता गँगचे हल्ले असे म्हटले जाते.

३. पोलीसांच्या विविध सक्रीय उपाययोजनांमुळे अशा घटनांमध्ये लक्षणीय घट झाली आहे.

**इ. अवैध दारु दुर्घटना :**

१. ही खरोखरच अतिशय गंभीर घटना होती, जी आम्ही अत्यंत गांभीर्याने आणि संवेदनशीलतेने घेतली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांसह इतर दोन अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.

२. या दु:खद घटनेसाठी कोणतेही समर्थन देण्याचा प्रयत्न न करता, आम्ही कायद्याची अंमलबजावणी अधिक कडक करण्यासाठी आणि पुणे शहर व आसपासच्या परिसरातील सर्व बेकायदेशीर दारुची भट्टी उध्वस्त करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही आणि गुन्हेगारांना लवकरात लवकर शिक्षा मिळवून देऊ.

**३.** येथे नमुद करु इच्छितो की, सन २०२६ मध्ये १००० हून अधिक बेकायदेशीर दारु विक्रेत्यांवर कारवाई करुन १ कोटींपेक्षा अधिक मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत यात ९९ टक्यांनी वाढ झालेली आहे. तसेच गेल्या २ वर्षात १५ बेकायदेशीर दारु विक्रेत्यांना एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबध्द करण्यात आले आहे. एवढी कठोर कारवाई करुनही ही दु:खद घटना घडली. अशा कारवाया मोडून काढण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत.

**फ. लॉकडाऊनची अफवा :**

**१. लॉकडाऊनची** चुकीची अफवा पसरविण्यात आली आहे, जी पुर्णपणे खोटी आणि गैरसमजावर आधारित आहे.

**२. बकरी-ईद अधिसुचना** - बकरी- ईदच्या पार्श्वभुमीवर महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ३७(१)(३) अंतर्गत एक नियामक अधिसुचना जारी करण्यात आली होती. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये कोणत्याही सणापुर्वी ही एक सामान्य आणि नियमित प्रथा आहे. याद्वारे कायदा व सुव्यवस्था आणि जातीय तणावाच्या परिस्थितीला प्रतिबंध करण्यासाठी आंदोलने आणि निदर्शने नियंत्रित करणे पोलीसांना शक्य होते. या नियमित अधिसुचनेला सोशल मिडीयावर लॉकडाऊन असे म्हटले गेले आणि गुन्हेगारी नियंत्रण , पेट्रोल टंचाई यासारख्या मुद्यांशी जोडले गेले हे पुर्णपणे वस्तुस्थितीला धरुन नाही.

**३. फेरिवाले :** असे निदर्शनास आले होते की, रात्री उशिरापर्यंत पदपथांवर चालणारे फेरिवाले, पान टप-या, फूड स्टॉल्स इत्यादी यामुळे अनुचित कृत्यांमध्ये गुंतलेल्या समाजकंटकाची गर्दी होत होती. याचा सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेवर विपरीत परिणाम होत होता. यामुळे कायमस्वरुपी आस्थापना, खानावळी आणि दुकांनावर कोणतेही निर्बंध न घालता अशा तात्पुरत्या आस्थापना रात्री १० वाजता बंद करणे आवश्यक वाटले. हे देखील नमुद करावेसे वाटते की, फेरिवाल्यांच्या परवान्यामध्ये आधीपासुनच रात्री १० वाजेपर्यंतच्या वेळेच्या मर्यादेची अट समाविष्ट आहे. त्यामुळे ही अमंलबजावणी नवीन नाही किंवा सदर अमंलबाजवाणी ही आधीपासुन अस्तित्वात असलेल्या कायादेशील तरतुदींपासुन वेगळी नाही.

**ग. महिलांची सुरक्षितता :**

१. महिलांची सुरक्षितता हा पुणे शहर पोलीसांसाठी सर्वोच्च प्राधान्याचा विषय आहे. सन २०२६ मध्ये बलात्कार आणि विनयभंगा च्या घटनांमध्ये अनुक्रम ७ टक्के आणि १ टक्का इतकी घट झालेली आहे. विविध सक्रीय उपाययोजनांद्वारे या आघाडीवर कडक लक्ष ठेवले जात आहे.

२. बेपत्ता अल्पवयीन मुले व मुलींचा शोध घेण्यातील आमची कामगिरी असाधारण राहीली असून, शोध घेण्याची टक्केवारी ९७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. तसेच बेपत्ता होण्याची बहुतेक सर्व प्रकरणे प्रेमसबंधातून उद्भवलेली असल्याचे आढळून आले आहे.

३. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करुन महिलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. आम्ही शहराच्या सर्व टेकडया आणि घाटांवर ए.आय. (AI) बेस्ड सीसीटीव्ही, फ्लड लाईट्स, आयपी आधारित स्पिकर्स आणि इमर्जन्सी कॉल बॉक्सेस बसवले आहेत आणि राज्य सरकारने अशा प्रकल्पांसाठी ८० कोटी रुपये मंजुर केले आहेत.

**ह. इतर उपाययोजना :**

पुणे शहर पोलीसांनी गुन्हेगारी आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी होती घेतलेल्या इतर काही महत्वपूर्ण उपायायोजनांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

१. पुणे सेफ सिटी सर्व्हेलन्स प्रोजेक्टचा एक भाग म्हणून २८०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे (प्रकल्प पूर्ण होण्याच्या टप्प्यात आहे.)

२. ए.आय. (AI) बेस्ड कॅमेरे आणि ड्रोन असलेली ५ मोबाईल सर्व्हेलन्स व्हॅन कार्यान्वित करण्यात आले आहे.

३. गुन्हेगारीस प्रतिबंध, वाहतूक नियमन, कायदा व सुव्यवस्था व्यवस्थापन इ. साठी सर्व कॅमे-यांवर लक्ष ठेवण्यासाठी एकात्मिक कमांड आणि कंट्रोल सेंटर (ICCC) सुरु करण्यात आलेले आहे.

४. संकटात सापडलेल्या पिडीतांच्या समस्या सोडवण्यासाठी शक्य तितक्या लवकर पोहोचण्याच्या आमच्या प्रयत्नात आमचा डायल ११२ प्रतिसाद वेळ सुमारे ८ मिनिटांचे आसपास आहे.

५. वाहतूक व्यवस्थापनातील आमच्या प्रयत्नांचे महत्वपुर्ण परिणाम दिसून आले आहेत. प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे सरासरी प्रवासाचा वेग १९.५ किमी/तास(जानेवारी २०२४) वरुन २३

किमी/तास पर्यंत वाढला आहे तसेच नजिकच्या भविष्यात सुरु असलेले प्रकल्प पूर्ण झाल्यावर या वेळेमध्ये आणखी सुधारणा होईल. वाहतूक व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे आम्हाला सकारात्मक परिणाम मिळाले आहेत. प्रस्तावित इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टिम (Intelligent Traffic Management System) जी सुरु करण्यात येणार आहे. प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि सरासरी रहदारीचा वेग वाढवण्यामध्ये सकारात्मक परिणामांना आणखी गती देईल.

६. मद्यपान करुन वाहन चालविणे आणि ट्रिपल सीट विरुध्दची अंमलबजावणी मोहिम ही आमची प्राथमिकता राहीली आहे. गेल्या २ वर्षात १७,००० मद्यधुंद वाहन चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. आणिक १,७०,००० व्यक्तींवर ट्रिपल सीट कारवाई करण्यात आली आहे, जी मागील कालावधीपेक्षा कित्येक पटीने जास्त आहे.

**निष्कर्ष :-**

पुणे शहर पोलीसांचे कार्यक्षमताचे विषयी उपस्थित करण्यात आलेले मुद्दे आणि प्रश्नांचे स्पष्टीकरण देण्याचा मी प्रयत्न केला आहे. शहरातील गुन्हेगारी नियंत्रित करण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस करत असलेले प्रयत्न आणि वस्तुस्थिती अधोरेखित करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी एका माननीय खासदारांना सादर केलेले हे स्पष्टीकरण आहे. आम्ही एक असे पोलीस दल आहोत जे आमचे कर्तव्य पार पाडण्यासाठी सतत रणनिती आखत असतो, नवनवीन प्रयत्न करत असतो, आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी करत असतो. हे दाखवून देण्यासाठी चा या पत्राव्दारे उचललेली पावले आणि त्याचे परिणाम ठळकपणे मांडण्यात आले आहेत.

सोशल मिडीयावर पुणे पोलीस दलाविषयी वस्तुस्थितीहीन नकारात्मक वातावरण पसरविले जात आहे , चुकीच्या आकडेवारीवर आधारित कोणतीही माहिती अनावधानाने नागरिकांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण करते, ज्यामुळे सार्वजनिक असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते आणि पोलीस दलाच्या मनोबलावर परिणाम होऊ शकतो. बरेच वेळी समाजकंटक अनेकदा कायदेशीर कारवाई च्या प्रयत्नांना कमकुवत करण्यासाठी आणि शहराची बदनामी करण्यासाठी अशा नकारात्मक वातावरणाचा फायदा घेतात. वर नमूद केलेली आकडेवारी उत्साहवर्धक आहे, आणि ती सुमारे ९००० अधिकारी आणि अंमलदारांच्या अफाट प्रयत्नांतून आणि असंख्य समुदाय नेते , स्वयंसेवक आणि सक्रिय नागरिकांच्या पाठिंब्याने शक्य झाले आहे. आम्ही विधायक (Constractive) टीकेचे स्वागत करतो , ती आमच्या कार्यप्रदर्शनावर लक्ष ठेवण्यासाठी आमचे सर्वात प्रभावी साधन म्हणून काम करते. आणि आमच्या कार्यावर आवश्यक नियंत्रण आणि संतुलन प्रधान करते. तथापि जेव्हा ते वस्तुस्थिती पासून वेगळें केले जाते आणि व्यवसायिक आणि वाजवी अपेक्षेच्या पलीकडे जाते , तेव्हा ते खरोखरच

मनोधैर्य खच्चीकरण करणारे असते. मी आपणास नम्रपणे विनंती करतो की, खरी व वस्तुस्थिती समोर आणण्यासाठी आपले मार्गदर्शन व सहकार्याची गरज आहे.

हे शहर एक शिक्षण व आय.टी. हब (IT Hub) आहे आणि ते गुंतवणुकीसाठी एक सुरक्षित आणि आकर्षक ठिकाण राहील, याची खात्री करण्यासाठी पोलीस विभाग सक्रियपणे काम करत आहे. जनते समोर वस्तुनिष्ठ सत्य मांडण्याच्या एकमेव हेतूने ही तथ्ये आपल्या सन्माननिय कार्यालयात सादर केली जात आहेत.

मी आपणास प्रांजळपणे विनंती करतो की, आपण व्यवस्थेवर आणि आमचे वर म्हणजे पुणे शहर पोलीसांवर विश्वास ठेवावा आणि आम्हांला अधिक चांगली कामगिरी करण्यास सहकार्य करावे. पुणे शहर पोलीसांच्या वतीने गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आमच्या अतुट वचन बध्दतेचा पुन: उच्चार करतो, आणि पुणेकरांची सेवा करण्याच्या आमच्या निरंतर प्रयत्नांमध्ये आपल्या मौल्यवान मार्गदर्शनाची आणि समर्थनाची नम्रपणे अपेक्षा करतो.

**(अमितेश कुमार)**
पोलीस आयुक्त, पुणे शहर

**प्रत माहितीकरीता सादर :-**

१. मा. श्रीमती सुनेत्रा पवार, पालकमंत्री, पुणे
२. मा. श्री. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, नवी दिल्ली
३. मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य
४.मा. श्रीमती माधुरी मिसाळ, राज्यमंत्री परिवहन, नगरविकास, सामाजिक न्याय व अल्पसंख्याक विकास
५. मा. श्रीमती मेधा कुलकर्णी, संसद सदस्य, नवी दिल्ली
६. मा. आमदार श्री. हेमत रासणे
७. मा. आमदार श्री. सिध्दार्थ शिरोळे
८. मा. आमदार श्री. भिमराव तापकीर
९. मा. आमदार श्री. चेतन तुपे
१० मा. आमदार श्री. सुनिल कांबळे
११. मा. आमदार श्री. बापूसाहेब पठारे
१२ मा. आमदार श्री. ज्ञानेश्वर कटके
१३ मा. आमदार श्री. योगश टिळेकर